# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८/०६/२०२२**

## जिल्हा : पुणे

### मागील आठवडयाचे हवामान :

**मागील आठवडयाचे हवामान :** पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान २९.० ते ३१.९ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २२.८ ते २४.५ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ७३ ते ९७ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ५२ ते ८४ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी २.० ते ५.५ कि.मी. होता.

**हवामान अंदाज :** पुढील पाच दिवसात पुणे जिल्ह्यात कमाल तापमान ३० ते ३२ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २२ ते २४ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ८२ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ६४ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी २१ ते २३ कि.मी. दरम्यान राहील. आकाश पूर्णतः ढगाळ राहील. वाऱ्याची दिशा नैऋत्तेकडून ईशान्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (२२/०६/२०२२ ते २८/०६/२०२२) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२८/०६/२०२२ ते ०२/०७/२०२२) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | दिनांक | 29 | 30 | 1 | 2 | 3 |
| 0.0 | 2.4 | 1.6 | 0.4 | 0.0 | 0.1 | 1.0 | पाऊस (मिमी) | 30 | 46 | 51 | 45 | 38 |
| 29.3 | 31.9 | 30.6 | 31.0 | 31.7 | 31.6 | 29.0 | कमाल तापमान (अं.से.) | 30 | 31 | 30 | 30 | 32 |
| 23.3 | 23.1 | 22.8 | 23.7 | 24.5 | 24.1 | 22.8 | किमान तापमान (अं.से.) | 24 | 23 | 22 | 22 | 23 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 8 | 8 | 8 | 8 | 8 |
| 81 | 97 | 78 | 74 | 73 | 73 | 88 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 83 | 81 | 82 | 82 | 83 |
| 71 | 60 | 84 | 52 | 55 | 84 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 57 | 57 | 67 | 69 | 71 |
| 5.5 | 3.2 | 2.0 | 2.9 | 5.3 | 4.8 | 4.5 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 21 | 22 | 21 | 23 | 23 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 248 | 248 | 248 | 248 | 248 |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २८ व २९ जून, २०२२ रोजी काही ठिकाणी पावसाची शक्यता असून दिनांक ३० जून, २०२२, ०१ व ०२ जुलै, २०२२ रोजी बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २८ व ३० जून, २०२२ रोजी घाट क्षेत्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक ०३ ते ०९ जुलै, २०२२ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात. |

| | | |
|---|---|---|
| | | • पावसाचा अंदाज बघून पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करावी.<br>• शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• तसेच शेतकरी बंधूनी मेघगर्जना व विजेचा पूर्वानुमाना करीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• खरीप पिकांच्या पेरणीसाठी जमिनीची मशागत पुर्ण करावी तसेच बांध बंदिस्ती करुन घ्यावी व पेरणीसाठी लागणारे सुधारित प्रमाणित बियाणे व इतर निविष्ठांची उपलब्धता करुन ठेवावी. पडणा-या पावसाचे पाणी शेतात साठवण्यासाठी/ मुरविण्यासाठी उपाय योजना करावी.<br>• शेतकरी बंधूनी आपल्या भागात पेरणीची घाई करू नये. खरीप हंगामातील पिकांची पेरणी १५ जुलै पर्यंत करता येऊ शकते. पेरणीयोग्य पुरेसा पाऊस झाल्यानंतर पेरणी करणे योग्य राहील.<br>• नत्र खत मात्रेच्या बचतीसीठी द्विदल पिकांना रायझोबियम , एकदल पिकांना ॲझोटोबॅक्टर जिवाणु संवर्धकाची पेरणीपूर्वी बिजप्रक्रिया करण्यासाठी उपलब्धता करून ठेवावे. जिवाणू संवर्धक खरेदी करताना पाकीटावरील अंतिम तारीख व पिकाचे नाव पाहूनच खरेदी करा , कारण हे जिवाणू संवर्धक वेगवेगळ्या पिकासाठी वेगवेगळे असते . जिवाणु संवर्धक खते वापरल्याने रासायनिक खतांची उणीव संपूर्णपणे भरून काढता येत नाही म्हणून ही खते रासायनिक खतांना पुरक खते म्हणून वापरावे. |
| खरीप हंगाम | पुर्वतयारी | शेतकरी बांधवानी खरीप हंगामासाठी पिकांची निवड, पिकांच्या वाणांची निवड, त्या पिकासाठी योग्य जमीन निवडणे व सर्व इतर नियोजन करण्यासाठी तयारी सुरु करावी. पेरणीसाठी सुधारित/ संकरित वाणांचे बियाणे शासकीय यंत्रणेकडून/ कृषि विद्यापीठांच्या विक्री केंद्राकडून उपलब्ध करुन ठेवावे. पूर्वमशागत : एक नांगरट, दोन कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन भुसभूशीत करावी व शेवटच्या कुळवणी अगोदर अवशक्तेनुसार व उपलब्धतेनुसार कंपोस्ट / शेणखत शेतात मिसळावे. |
| बियाणे खरेदी करताना घ्यावयाची काळजी : | | शक्यतो प्रमाणित बियाणे पेरणीसाठी वापरावे. बियाणे अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करून त्याची पक्की पावती घ्यावी. विकत घेतलेल्या बियाण्याच्या पिशवीस असलेले लेबल व टॅग जपून ठेवावा , यदाकदाचित बियाण्यात काही दोष आढळल्यास बिल , लेबल व टॅगची संबंधितांकडे तक्रार करताना गरज पडते. |
| भात | पूर्व तयारी / रोपवाटीका पेरणी | एक हेक्टर क्षेत्र लागवडीसाठी १० गुंठे रोपवाटीका तयार करावी. पेरणीसाठी सुधारित/ संकरित वाणांचे बियाणे शासकीय यंत्रणेकडून/ कृषि विद्यापीठांच्या विक्री केंद्राकडून उपलब्ध करुन ठेवावे. गादीवाफे तयार करताना १ मी रुंदीचे, १५ सेमी उंचीचे व आवश्यकतेनुसार लांबीचे गादीवाफे तयार करुन ठेवावे. वाफे तयार करताना २५० किलो शेणखत प्रति गुंठा मातीत मिसळावे. पेरणीपुर्वी ३०० ग्रॅम मिठ १० लिटर पाण्यात मिसळुन त्यामध्ये भाताचे बियाणे २० मिनिटे बुडवून ठेवावे व त्यानंतर सावलीत सुकवुन रोपवाटि केत पेरणी करावी. पेरणीपूर्वी बियाण्यास २.५ ग्रॅम प्रती किलो याप्रमाणे कार्बेन्डॅझिम किंवा थायरम/ कॅप्टन बुरशीनाशक चोळावे. त्यानंतर ॲझोटोबॅक्टर, स्फुरद विरघळणारे जीवाणू व ॲझोस्पिरीलम या जीवाणू खतांची २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. |
| ऊस | वाढीची अवस्था | पुर्व मौसामी पाऊस झाल्यावर हुमणीचे भुंगेरे सायंकाळी बाभूळ , कडूनिंब, बोर या झाडांवर जमा होतात. अगोदर मादी भुंगेरे व त्यानंतर नर भुंगेरे जमिनीतून बाहेर पडतात. या झाडांवर बसून ते झाडांचा पाला खातात. अश्या झाडांच्या फांद्या रात्रीच्या वेळी काठीच्या सहाय्याने हलवून सामुदायिकरित्या खाली पडलेले भूंगेरे गोळा करून रॉकेल मिश्रित पाण्यात टाकून त्यांचा नाश करावा. ऊस पिकासाठी ठिबक सिंचन पाणी व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा. पाचट आच्छादनाचा वापर करून सरी आड सरीतून पाणी द्यावे. |
| कांदा | साठवणूक अवस्था | सावलीमध्ये सुकविलेल्या कांद्याची प्रतवारी करुन कांदाचाळीमध्ये साठवणुक करावी. तसेच चाळीच्या चारही बाजुस व तळाला बुरशिनाशकाची फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| आंबा | काढणी अवस्था | नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना वाऱ्यापासून संरक्षणासाठी काठीचा आधार द्यावा. फळमाशीच्या नियंत्रणासाठी मिथिल युजेनॉल युक्त रक्षक सापळे बागेमध्ये एकरी ८-१० याप्रमाणे लावावेत. तयार झालेली आंब्याची फळे काढून सुरक्षित ठिकाणी पिकण्यासाठी ठेवावे. |
| केळी | | झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गर्जेप्रमाणे बांबूच्या किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाट्यांच्या सहयायाने झाडांना/ घडाना आधार/ टेकू द्यावा. केळीच्या बुंध्याजवळ वाढणारी पिल्ले नियमित कापावीत तसेच केळीवरील जुनी वाळलेली व रोगट पाने कापून बाग स्वच्छ ठेवावी. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जंताच्या व विविध आजाराच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक व लसी जनावरांना पाजावे/ टोचून घ्यावे. लाळखुरकत, फऱ्या व घटसर्प या रोगांच्या एकत्रित रोग प्रतिबंधक लसी टोचून घ्याव्यात. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : २८.०६.२०२२

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**